# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०९ मार्च, २०२३ / फाल्गुन १८, १९४४ (शके)**

**(१) महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री**
**(२) वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री**
**(३) रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री**
**(४) कृषि मंत्री**
**(५) सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री**
**(६) राज्य उत्पादन शुल्क मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३७**

---

### शाहीर कलावंताच्या विविध मागण्या मान्य करण्याबाबत

**(१) * १७७५१ श्री.अंबादास दानवे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्ये मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाहीर कलावंतांच्या शिष्टमंडळाने वृध्द कलावंतांच्या मानधनात वाढ करणे, जिल्हा समितीमध्ये प्रतिवर्षी ३०० मानधन प्रकरणे घेणे, वार्षिक उत्पन्नाच्या प्रमाणपत्राची मर्यादा रुपये ४८ हजारांवरून २ लाख करणे, वृध्द कलावंतांची वयोमर्यादा ५० वर्षाहून ४० वर्षे करणे, कोरोना काळात जाहीर करण्यात आलेले पॅकेज तात्काळ देणे, वृध्द कलाकारांना सर्व आरोग्य सेवा मोफत देणे, शासनमान्य शिखर संस्था सभासद व राहत्या गावी घर बांधण्यास बँकेमार्फत बिनव्याजी कर्ज देणे, इ. मागण्यांसंदर्भात दिनांक २० डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यासुमारास मा.मंत्री सांस्कृतिक कार्ये यांना निवेदन देऊन नागपूर येथे मोर्चा काढण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शाहीर कलावंताच्या मागण्यांचा विचार करुन त्या पूर्ण करण्याच्यादृष्टीने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र शाहीर परिषद नागपूर, यांच्या प्राप्त निवेदनातील मागण्यांमधील विषय वेगवेगळ्या विभागांशी संबंधित असल्याने त्या संबंधित विभागांकडे उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्या आहेत. विभागाशी संबंधित मागण्यांबाबत शासन सकारात्मक आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मत्स्य बंदरांमधील गाळ काढून बंदरे सुस्थितीत करण्याबाबत

**(२) * १६९७९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ हा कायदा दिनांक ४ ऑगस्ट १९८२ पासून अंमलात आला असून उक्त कायद्याच्या अंमलबजावणीनंतर राज्यात मासळी उतरविण्याची १७३ बंदरे कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बंदरे गाळाने भरलेली असल्याने २४ तास मच्छिमारांच्या वापरात येत नसल्यामुळे मच्छिमारांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील १७३ बंदरांमधील गाळ काढून सदर बंदरे २४ तास सुरू ठेवण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

राज्याच्या सागरी किनारपट्टीवर एकूण १७३ मासळी उतरविण्याच्या केंद्रांपैकी काही बंदरावर सागरी प्रवाहामुळे गाळ साचत आहे. त्यामुळे मासेमारी नौकानयनास अडथळे निर्माण होत असल्याबाबत मच्छिमार संस्थांकडून निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) व (४) राज्यातील १७३ बंदरामधील गाळ काढून बंदरे २४ तास सुरू ठेवण्याच्या कामांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. राज्यातील मत्स्य बंदरामधील गाळ काढण्यासंदर्भात मत्स्यव्यवसाय विभाग, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड व मच्छिमार संस्था यांच्या बैठका होऊन ४३ ठिकाणी गाळ उपसनी क्षेत्र निश्चित केले आहे. याबाबतच्या प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे.

मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील पायाभूत सुविधा विकास निधी योजना अंतर्गत हर्णे, साखरीनाटे, जीवना, भरडखोल, सातपाटी ही पाच कामे करण्यात येत आहे. त्यानुषंगाने आवश्यक पर्यावरण पूरक परवानगी घेण्याची कार्यवाही महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांच्याकडून करण्यात येत आहे. सदर प्रकल्पामध्ये ड्रेजिंग (गाळ काढणे) चा समावेश आहे.

-----------------

## गोंदिया जिल्ह्यात रोजगार हमी योजनेंतर्गत बनावट मजूर सहकारी संस्थांना कामे दिल्याबाबत

**(३) * १७५२८ श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यात रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०१०-२०११ मध्ये रुपये १० कोटी रस्ते व पुलाच्या बांधकामासाठी निविदा प्रकाशित न करता तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी अस्तित्वात नसलेल्या बनावट मजूर सहकारी संस्थांना कामे दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अस्तित्वात नसलेल्या बनावट मजूर सहकारी संस्थांना कामे देणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्नच उद्भवत नाही.
(३) सन २०१०-२०११ मध्ये जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, गोंदिया या विभागाकरिता रस्ते व पुलाच्या बांधकामासाठी रुपये १० कोटी मंजूर झालेले नसल्याने निविदा प्रकाशित करण्यात आलेली नव्हती. तसेच कामे मंजूर झालेली नसल्याने बनावट मजूर सहकारी संस्थांना कामे देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना जिल्ह्यातील पानशेंद्रा येथे सीड पार्क उभारण्याबाबत

**(४) * १७०८९ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ११८०९ ला दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशात २५ वर्षांपूर्वी जालना येथील महिको कंपनीने (बायोटेक्नो) जैवतंत्रज्ञानाचा वापर कापूस उत्पादनात केला म्हणून भारत देश कापूस उत्पादनात जगात पहिल्या पाच देशात गणला जाऊ लागला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जालना जिल्ह्यात शेतकऱ्यांसाठी महत्वाकांक्षी असलेला सीड पार्क (बायोटेक्नो पार्क) उभारण्याबाबतचा निर्णय सन २०१४ मध्ये घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सीड पार्क (बायोटेक्नो पार्क) उभारणीकरिता जिल्हाधिकारी, जालना यांनी ७५ एकर जमीन मौजे पानशेंद्रा, जि.जालना येथे उपलब्ध करुन दिलेली असून सदर प्रकल्प उभारणीसंदर्भातील कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, जालना येथे सीड पार्कची उभारणी झाल्यास शेतकऱ्यांना माती परिक्षण, चांगल्या प्रतिचे बियाणे, उगवण क्षमता, उत्पादन क्षमता वाढ, यांसह अन्य सुविधा उपलब्ध होऊन आर्थिक लाभ होणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उद्योजक व शेतकऱ्यांकडून कृषि विभाग, महाबीज, जिल्हा प्रशासन, बियाणे उद्योजक व प्रशासनाच्या उदासीन भुमिकेबद्दल नाराजी व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जालना जिल्ह्यातील पानशेंद्रा येथे सीड पार्क (बायोटेक्नो पार्क) उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) कापूस उत्पादनात भारत देश हा नेहमीच जगातील पहिल्या पाच देशात अग्रेसर आहे.

(२) जालना जिल्ह्यात सीड पार्क प्रकल्प विकसित करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १३/१०/२०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. .

(३) हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) हे खरे नाही.

(६) राज्यात बियाणे उत्पादन क्षेत्रात वाढीसाठी पोषक वातावरण निर्मिती करण्यासाठी जालना येथे सीड पार्क उभारण्याचे प्रस्तवित आहे. सदर प्रकल्पासाठी ७५ एकर जमीन मौजे पानशेंद्रा, जि.जालना येथे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सीड पार्क उभारणी संदर्भात बियाणे उद्योजकांना आवश्यक असणाऱ्या सुविधा तसेच या प्रकल्पामध्ये सहभाग घेणाऱ्या सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील बियाणे उद्योजकांच्या गरजा निश्चित करुन डी.पी.आर. तयार करण्यात आला आहे. सीड पार्क प्रकल्प विकसित करण्यास निधी मिळणेबाबत राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत प्रस्ताव केंद्र शासनास सादर केलेला आहे. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार सदर प्रकल्पाचा टेक्नो फायनान्स इव्हॅल्युशन अहवाल तयार करण्याकरिता मे.नॅबकॉन्स, पुणे या संस्थेशी करार करण्यात आला असून त्याचा अहवाल एप्रिल, २०२३ पर्यंत प्राप्त होणे अपेक्षित आहे.

-----------------

## अकोला जिल्ह्यामध्ये तूर पिकावर बुरशी रोगाचा प्रादुर्भाव झाल्याबाबत

**(५) * १७३६४ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात ७५ हजार हेक्टरवरील तूर पिकावर बुरशी रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने तूर उत्पादनात घट झाली असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाच्या कीटक शास्त्र विभागाने या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता शेतकऱ्यांना प्रत्यक्ष भेटून सल्ला देण्याऐवजी परस्पर उपाययोजना सुचविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त तूर उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे जुलै ते ऑक्टोबर, २०२२ अखेर जिल्ह्यात नैसर्गिक आपत्ती अंतर्गत अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे तूर पिकाचे एकूण ३०२७३.१८ हे क्षेत्राचे नुकसान झालेले असून सततच्या तसेच अधूनमधून पडणाऱ्या आणि लांबलेल्या पावसाळी हंगामामुळे तूर पिकावर फायटोफ्थोरा, कोरडी मूळ कुज, मर रोग व फोमा या बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव काही ठिकाणी काही प्रमाणात आढळून आला.

(२) हे खरे नाही.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाच्या रोगशास्त्र विभागाच्या तज्ज्ञांनी रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर प्रत्यक्ष भेटून निरिक्षणे घेतली व उपाययोजना सुचविलेल्या आहेत,

(३) अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे बाधित झालेल्या क्षेत्रांसाठी नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही मदत व पुनर्वसन विभागामार्फत सुरु आहे.

(४) निरंक.

-----------------

## राज्यात जातनिहाय जनगणना करण्याबाबत

**(६) * १७३०९ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिहार राज्य शासनाने दिनांक ७ जानेवारी, २०२३ पासून जातनिहाय गणना (आर्थिक/सामाजिक पाहणी) सुरु केली असून त्या धर्तीवर महाराष्टातही जातनिहाय गणना (आर्थिक/सामाजिक पाहणी) सुरु करण्याबाबतची मागणी इतर मागास बहुजन कल्याण आणि अन्य मागास संघटनांनी केली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर मागास बहुजन कल्याण प्रवर्गातील लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण, मराठा-कुणबी समाजाच्या आरक्षणाच्या पुन:र्स्थापनेची मागणी, अन्य/ इतर धर्मातील मागासवर्गीय जाती यांचेबाबत मा.उच्च न्यायालयाने मान्य केलेल्या आरक्षणाची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जातनिहाय जनगणना करण्याबाबत व मराठा व अन्य प्रवर्गाकरिता वाढीव आरक्षणाबाबत शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांनी प्राप्त विनंती अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १२/०९/२०२२ रोजी मराठा समाजाचे इतर मागास प्रवर्गाबरोबर सर्वेक्षण होणेबाबत व अन्य मागण्याबाबत प्राप्त निवेदनावर आयोजित करण्यात आलेल्या सुनावणीवेळी आयोगाने “मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर सर्व संघटनांना सुनावणीची संधी देऊन गुणवत्तेआधारे योग्य तो निर्णय घेण्यात येईल.” असा निर्णय घेतला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोखाडा (जि.पालघर) येथील तृणधान्य पिकांचे नुकसान झाल्याबाबत

**(७) * १७०८२ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) येथील आदिवासीबहुल भागात भात, नागली, वरई इ. तृणधान्यांची पिके घेतली जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निसर्गाच्या लहरीपणामुळे माहे जुलै, २०२२ मध्ये पावसाअभावी कडक उन्हाळयासारखी परिस्थिती उद्भवल्याने भात, नागली, वरई पिकांची रोपे करपून पिवळी पडल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना खरीप हंगामामध्ये झालेल्या नुकसानीमुळे शासनाकडून नुकसान भरपाई मिळावी यासाठी तेथील ग्रामस्थांनी मा.मंत्री, कृषी, मा.प्रधान सचिव, कृषी, जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे दिनांक १२ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मोखाडा (जि.पालघर) येथील आदिवासीबहुल भागातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) जुलै, २०२२ मध्ये पुरेशा प्रमाणात पर्जन्यमान झाले होते, सबब नुकसानीचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील गड-किल्ले, मंदिरे व महत्त्वाची संरक्षित स्मारके इत्यादींच्या संवर्धनासाठी निधीची तरतूद करण्याबाबत

**(८) * १७८५२ श्री.श्रीकांत भारतीय, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्ये मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गड-किल्ल्यांच्या संवर्धनासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करावे या मागणीसाठी राज्यभरातील शिवप्रेमींनी मुंबईतील आझाद मैदानावर माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील गड-किल्ले, मंदिरे व महत्त्वाची संरक्षित स्मारके इत्यादींच्या संवर्धनासाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत आर्थिक वर्ष सन २०२३-२०२४ पासून पुढील तीन वर्षांसाठी ३ टक्के निधीची तरतूद करण्यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या सांस्कृतिक कार्ये विभागाने पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयामार्फत ३८७ स्मारके संरक्षित म्हणून घोषित केलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या स्मारकांच्या संवर्धनाकरिता शासन निर्णय असतानाही कोणत्याही जिल्ह्याच्या जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत अद्यापपर्यंत ३% ची निधीची तरतूद करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील गड-किल्ले, मंदिरे व महत्त्वाची संरक्षित स्मारके इत्यादींच्या संवर्धनासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करुन निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय. हे खरे आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३) राज्यात एकूण ३८६ राज्य संरक्षित स्मारके घोषित करण्यात आली आहेत.
(४) सदर तरतूद सन २०२३-२४ या आर्थिक वर्षापासून पुढील ३ वर्षासाठी करण्यात येणार आहे.
(५) अशा स्वरुपाचा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही. मात्र राज्य संरक्षित स्मारकांचे जतन संवर्धनासाठी शासकीय निधीसोबतच बाह्यस्त्रोताद्वारे निधी उपलब्ध व्हावा व त्यांचे जिल्हास्तरावर योग्य प्रकारे व्यवस्थापन व्हावे या हेतूने जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा महावारसा सोसायटी स्थापन करण्याचे विचाराधीन आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पाथरी (जि.परभणी) येथे सहाय्यक निबंधक कार्यालय स्थापन करणेबाबत

**(९) * १७१८२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी : दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक ८६८५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाथरी (जि.परभणी) तालुक्यातील ५६ गावातील नागरिकांची होत असलेली गैरसोय लक्षात घेऊन पाथरी तालुक्यासाठी सहाय्यक निबंधक (सहकार विभाग) कार्यालय स्थापन करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सन २०२१ मध्ये मा.सहकार मंत्री यांच्याकडे ई-मेलव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाथरी येथे सहाय्यक निबंधक कार्यालय स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पाथरी तालुक्यासाठी स्वतंत्र सहाय्यक निबंधक कार्यालय स्थापन करुन कर्मचारी नेमणुकीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) होय हे खरे आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्यावतीने विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याकरिता संस्थेची निवड करण्याबाबत

**(१०) * १७२९९ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर : तारांकित प्रश्न क्रमांक १५८६० ला दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (महाज्योती) वतीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेच्या पूर्व प्रशिक्षणासाठी १५००० प्रवेशित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या बदललेल्या अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याकरिता किमान ३ प्रशिक्षण संस्थांची गरज असताना पुण्यातील ज्ञानदीप ॲकॅडमी या एकमेव संस्थेची निवड करण्यात आली असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, बदललेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे विद्यार्थ्यांकरिता २७ वैकल्पिक विषय असल्यामुळे १५०० विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात प्रशिक्षण देणे एका संस्थेला शक्य नसून या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या योग्य प्रशिक्षणासाठी महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेचा निर्णय बदलणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या बदलेल्या अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याकरिता ज्ञानदीप ॲकॅडमी व्यतिरिक्त अन्य दोन प्रशिक्षण संस्थांची निवड करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) नाही, महाज्योती संस्थेस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी १४८५ विद्यार्थी प्रवेशित आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महसूल विभागांतर्गत ७५ हजार पदांची भरती प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत

**(११) * १७०२७ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय पदभरती प्रक्रियेत सुसूत्रता नसल्याने राज्य शासनाने महसूल विभागांतर्गत वर्ग ३ आणि वर्ग ४ संवर्गातील ७५ हजार पदांची भरती प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल विभागीय स्तरावर भरती करण्याकरिता महसूल विभागात प्रत्येक खात्याचे प्रादेशिक नियुक्ती अधिकारी नियुक्त करण्यात येऊन रिक्त पदांसाठी प्रत्येक महसूल विभागात स्वतंत्र जाहिरात प्रसिध्द करणे, भरती प्रक्रिया राबविण्यासाठी कंपन्यांबरोबर स्वतंत्र करार करणे आणि प्रत्येक विभागात समान पदासाठी वेगळी परीक्षा घेणे ही प्रक्रिया राबविण्याकरिता शासनाने टीसीएस आणि आयबीपीएस या कंपन्याची नियुक्ती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, काही खात्यांमध्ये प्रत्येक महसूल विभागात केवळ १ ते २ समान पदे रिक्त असल्यामुळे सदरहू पदांसाठी संपूर्ण भरती प्रक्रिया राबविणे सदर कंपन्यासाठी त्रासदायक ठरत असल्याने ही भरती प्रक्रिया प्रलंबित राहिल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रिक्त पदांच्या पदभरती प्रक्रियेस बराच कालावधी लागणार असल्याने महसूल विभागीय स्तरावर विविध खात्यांमधील पदे भरण्यापेक्षा प्रत्येक खात्यातील विभागीय स्तरावरील रिक्त पदांची माहिती मुख्यालयाकडून मागविण्यात यावी आणि सर्व राज्यांसाठी एकत्रित भरती प्रक्रिया राबविण्यासाठी कंपन्यांबरोबर एकत्रित करार करावा अशी मागणी नागरिकांकडून व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून शासनास करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यांसाठी एकत्रित भरती प्रक्रिया राबविण्याकरिता कंपन्याबरोबर एकत्रित करार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून आगामी एका वर्षाच्या कालावधीत राज्यातील विविध विभागातील शासकीय कार्यालयांमधील ७५ हजार पदे भरण्याचा राज्य शासनाचा मानस आहे. त्यापैकी महसूल विभागांतर्गत असलेल्या वर्ग-३ संवर्गातील लघुटंकलेखक, महसूल सहायक, तलाठी, कनिष्ठ लिपिक, भूकरमापक लिपिक टंकलेखक यासंवर्गांच्या ७२७८ पदांचा तर वर्ग-४ संवर्गातील नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागातील शिपाई संवर्गाच्या-२८४ अशा एकूण-७५६२ पदांचा समावेश आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(५) व (६) महसूल विभागांतर्गतच्या लघुटंकलेखक, तलाठी तसेच भूमि अभिलेख विभागांतर्गतच्या भूकरमापक लिपिक या (गट-क) संवर्गाच्या पदांची भरतीप्रक्रिया राबविण्याबाबत TCS / IBPS या खाजगी संस्थांमार्फत भरण्याच्या अनुषंगाने अपर जमाबंदी आयुक्त, पुणे यांची “राज्यस्तरीय नोडल अधिकारी” म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

तसेच महसूल सहायकाची पदे भरण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २०/०१/२०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे कनिष्ठ लिपिक संवर्गाची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याकरिता मागणीपत्र आयोगास पाठविण्यात येत आहे.

नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागातील शिपाई (गट-ड) संवर्गाच्या पदांची भरतीप्रक्रिया राबविण्याबाबत TCS / IBPS या खाजगी संस्थांमार्फत भरण्याच्या अनुषंगाने नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नोंदणी कार्यालयाकडून कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यातील कृषि कर्ज वाटपातील पतपुरवठाविषयक कामकाजात सुधारणा करण्याबाबत

**(१२) * १७५८० श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील छोटया-मोठ्या उद्योगांना पतपुरवठा करणाऱ्या बँका कृषि कर्ज देत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषि क्षेत्रातील पायाभूत कामांसाठी करण्यात येणारा पतपुरवठा सुधारण्यात यावा असे रिझर्व्ह बँकेने राज्यातील राष्ट्रीयकृत बँकांना आदेशित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषि क्षेत्रासाठी सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात किती कर्जवाटपाचे उद्दीष्ट दिलेले आहे, त्यापैकी किती बँकांनी उद्दीष्ट साध्य झालेले आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कृषि कर्ज वाटपास टाळाटाळ करणाऱ्या बँकांनी पतपुरवठा विषयक कामकाजात सुधारणा करुन दिलेल्या उद्दीष्टांनुसार कर्जवाटप करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) नाही.

(२) सदर बाब सहकार विभागाशी संबंधित नाही.

(३) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये कृषि क्षेत्रासाठी रुपये १,०३,४२४ कोटी रकमेचे उद्दीष्ट देण्यात आले असून माहे सप्टेंबर, २०२२ अखेर रुपये ५५,०२० कोटीचे कर्जवाटप करण्यात आले आहे.(उद्दीष्ट पुर्तता- ५३%) यापैकी खरीप पीक कर्ज पुरवठ्यासाठी देण्यात आलेल्या रुपये ४५,०९१ कोटीच्या उद्दीष्टापैकी, माहे सप्टेंबर, २०२२ अखेर रुपये ३८,८०६ कोटी रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे. (उद्दीष्ट पुर्तता-८६%). उर्वरीत कर्जवाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(४) राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या सभेमध्ये बँकांना दिलेल्या उद्दीष्टांनुसार कर्जवाटप करण्याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात अतिवृष्टी व महापुरामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक कर्ज माफी देण्याबाबत

**(१३) * १७३५२ श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२२ मध्ये अतिवृष्टी व महापुरामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्यांना पीक कर्जाची रक्कम भरण्यास अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिवृष्टीमुळे झालेल्या पीक नुकसानीचे सर्वेक्षण करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना देय असलेली आर्थिक मदत जाहीर करुन त्याचे वाटप करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना देय असलेली आर्थिक मदत न दिल्यामुळे शेतकरी बँकांकडून घेतलेल्या कर्जाचा परतावा करु शकत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना देय असलेली आर्थिक मदत मिळणेबाबत तसेच जे शेतकरी पीक कर्ज भरु शकत नाहीत त्यांची कर्जमाफी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) माहे जून ते ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत अतिवृष्टी, सततचा पाऊस, शंखी गोगलगाय इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषापेक्षा दुप्पट दराने व ३ हेक्टरच्या मर्यादेत शेतीपिकांच्या नुकसानीकरिता व मालमत्तेच्या नुकसानीकरिता महसूल विभागाच्या दिनांक २२/०८/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये ७०९३.१९ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला. सदर निधीपैकी रुपये ४७५०.९३ कोटी इतका निधी प्रत्यक्षात वितरीत करण्यात आला असून उर्वरित निधी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती आश्रमशाळांमधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन वेळेवर अदा करणेबाबत

**(१४) * १७५७६ श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळांमधील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, कोल्हापूर या कार्यालयाच्या अधिनस्त कोल्हापूर जिल्ह्यामध्ये १४ प्राथमिक, ०८ माध्यमिक व १ उच्च माध्यमिक अशा एकूण २३ विजाभज आश्रमशाळांमध्ये २६२ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आश्रमशाळांमधील शिक्षकांना माहे ऑगस्ट, २०२२ ते ऑक्टोबर, २०२२ या कालावधीतील म्हणजेच मागील तीन महिन्यांचे नियमित वेतन अदा करण्यात आले असून उर्वरित दोन महिन्यांचे नियमित वेतन प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यामधील सर्व आश्रमशाळांचे मुख्याध्यापक यांना प्रत्येक महिन्याच्या २० तारखेपर्यंत वेतन देयक सहाय्यक आयुक्त, कोल्हापूर या कार्यालयास सादर करण्याबाबत सूचित केल्यानुसार कार्यवाही करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील सर्व आश्रमशाळांतील शिक्षकांचे नियमित वेतन वेळेवर अदा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, कोल्हापूर या कार्यालयाच्या अधिनस्त मुख्याध्यापक यांचेकडून माहे ऑक्टोबर, २०२२ वगळता एकदाही वेतन देयके चालू महिन्याच्या २० तारखेपूर्वी प्राप्त झालेली नाहीत.

(४) कोल्हापूर जिल्ह्यामधील विमुक्त जाती, भटक्या जमाती आश्रमशाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वेतनाबाबतची कार्यवाही सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण कोल्हापूर कार्यालयाद्वारे यथोचितरित्या पार पाडण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांना गावठाणा बाहेरील जमिनीवर प्रकल्प उभारणीकरिता विकास शुल्कात सूट देण्याबाबत

**(१५) * १७०१३ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन-स्मार्ट प्रकल्प अंतर्गत नागपूर जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांना गावठाणा बाहेरील जमिनीवर प्रकल्प उभारणीकरिता नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांची मंजुरी घेणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये अनेक शेतकरी उत्पादक कंपन्यांना आयुक्त, कृषि व प्रकल्प संचालक, स्मार्ट यांच्यामार्फत स्वच्छता व प्रतवारी प्रकल्पास मंजुरी प्रदान करण्यात आली असून सदर प्रकल्पाची निर्मिती शेतकऱ्यांच्या गावातील शेतमालाची स्वच्छता व प्रतवारी लक्षात घेवून शेतकऱ्यांच्या उत्पादीत मालाला योग्य भाव मिळण्याकरिता करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यातील अनेक निर्माता (प्रोड्युसर) कंपन्यांनी भाडे करार तत्वावर गावठाणा बाहेर जागा घेऊन विकास शुल्क भरले नसल्यामुळे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सदरहू कंपन्यांना बांधकाम करण्यास मनाई केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांनी गावठाणा बाहेरील जमिनीवर प्रकल्प उभारणीकरिता विकास शुल्कात सूट देवून महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांच्या मंजुरीची अट शिथील करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) नाही, शासन निर्णय कृषि व पदुम विभाग, क्र. कृराधो-१४१७/प्र.क्र. १०९/९-अे, दिनांक ०६ जून, २०१८ मधील तरतुदीनुसार राज्याच्या अन्न प्रक्रिया धोरणानुसार सुक्ष्म लघु व मध्यम अन्न प्रक्रिया उद्योगांकरिता २० हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत जमिनीच्या बिगरशेती वापरासाठी सक्षम अधिकाऱ्यास अवगत करावे, उद्योजकास सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्व मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही, असे नमूद आहे.
(२) होय. मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत नागपूर जिल्ह्यातील ५ शेतकरी उत्पादक कंपन्यांना शेतमाल स्वच्छता व प्रतवारीचे उपप्रकल्प मंजूर करण्यात आलेले आहेत.
(३) नाही, आजमितीअखेर नागपूर महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने शेतकरी उत्पादक कंपन्यांना बांधकाम करण्यास मनाई केली असल्याचे कोणत्याही कंपन्यांनी कळविलेले नाही.
(४) मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पाच्या दिनांक २५/०७/२०२२ च्या पत्रान्वये उपप्रकल्पासाठी बांधकामास सुरुवात करण्यापूर्वी सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याची मान्यता घेण्याबाबत अट घालण्यात आली होती. मात्र दिनांक ०६ जून, २०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदर अट दिनांक १३/०९/२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये प्रकल्प संचालक, मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प यांनी रद्द केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई उपनगरातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानांतर्गतच्या दिंडोशी टेकडीवर आग लागल्याबाबत

**(१६)** * **१७८५० श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा (नॅशनल पार्क) भाग असलेल्या दिंडोशी टेकडीवर भीषण आग लागली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिंडोशीच्या टेकडीवर लागलेली आग मानवनिर्मित असून अशा प्रकारे आग लावण्यात आल्याने जंगल नष्ट करून येथे अनधिकृतरित्या झोपड्या उभारण्याचे काम भूमाफियांमार्फत करण्यात येत असल्याचा आरोप पर्यावरणप्रेमींनी केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई उपनगरातील दिंडोशी भागात वन्यक्षेत्राच्या सुरक्षेसाठी तसेच जंगल नष्ट होऊ नये याकरिता कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे नाही.
दिनांक २९/११/२०२२ रोजी रात्री २१.०० वाजताच्या सुमारास मे. रहेजा इस्टेट व चौबे कंपाऊड या मालकी क्षेत्रात आग लागल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यामध्ये पीक विमा कंपनीने सर्वेक्षणादरम्यान गैरव्यवहार केल्याबाबत

**(१७) * १७३२५ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यामध्ये माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये अतिवृष्टीमुळे सोयाबीन पिकांसह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंपळदरी (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) येथे विमा कंपनीच्या प्रतिनिधींनी प्रत्यक्ष गावात उपस्थित न राहता नुकसान झालेल्या पिकांची माहिती भरुन शेतकऱ्यांच्या बनावट स्वाक्षऱ्या केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बाधित शेतकऱ्यांची माहिती भरताना पीक विमा कंपनीने केलेल्या गैरव्यवहाराप्रकरणी कारवाई करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून सर्वेक्षण फॉर्मची तपासणी केली असता बनावट स्वाक्षरी व कोरा फॉर्मवर काही शेतकऱ्यांच्या सह्या घेतल्याची बाब निदर्शनास आली आहे. याबाबत विमा कंपनीवर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, हिंगोली यांना देण्यात आलेले आहेत.

तसेच, झालेले सर्वेक्षण हे नुकसान भरपाई निश्चिती करिता विचारात घेण्यात आले नसुन, सदरचे सर्वेक्षण हे नमुना सर्वेक्षण (Sample Survey) पध्दतीने केले असल्याने बाधित क्षेत्र व नुकसानीची टक्केवारी ही जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय आढावा समितीच्या बैठकीत मान्यता दिल्यानंतर संबंधित विमा कंपनीमार्फत नुकसान भरपाई निश्चिती व वाटपाची कार्यवाही करण्यात आली आहे.

खरीप हंगाम २०२२ मध्ये योजनेंतर्गत हिंगोली जिल्ह्यात एकूण सहभागी अर्जदार ३.८९ लाख पैकी स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत ३.६६ लाख शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रुपये ९६.३६ कोटी निश्चित करण्यात आले असून त्यापैकी रुपये ९४.९७ कोटी वाटप करण्यात आले आहेत. त्यापैकी पिंपळदरी (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) मधील एकूण सहभागी अर्जदार १५७८ पैकी १५६७ शेतकरी अर्जदारांना रुपये १६.२९ लाख निश्चित करुन रुपये १६.०७ लाख वाटप करण्यात आले असून उर्वरित रुपये ०.२२ लाख नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) येथील तत्कालीन तहसिलदारांनी समुद्रालगतच्या जमिनीवरील नियमबाह्य बांधकामास परवानगी दिल्याबाबत

**(१८) * १७५०६ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चिंचणी (ता.डहाणू, जि.पालघर) येथील गट क्रमांक ५१३ व गट क्रमांक ५१४ ही जमीन महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४२ ड नुसार अकृषिक करण्याबाबत तत्कालीन तहसिलदार, डहाणू यांनी दिनांक ९ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करुन अनियमिततेने चिंचणी समुद्रालगतच्या जमीन मालकाला नियमबाह्य बांधकाम करण्याची सवलत दिल्याने तत्कालीन तहसिलदार, डहाणू यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यास विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी सदर प्रस्ताव शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार तत्कालीन तहसिलदारांनी केलेल्या अनियमिततेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे चिंचणी, ता.डहाणू, जि.पालघर येथील गट क्रमांक ५१३ व गट क्रमांक ५१४ या जमिनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४२ ड नुसार अकृषिक करण्याबाबत तत्कालीन तहसिलदार, डहाणू यांनी दिनांक ९ जून, २०२१ रोजीच्या आदेशान्वये परवानगी दिली आहे. सदर जमिनी सी.आर.झेड., फळबाग व समुद्राच्या उच्चतम भरती रेषेपासून २०० मीटरच्या आत येत असल्याचे निदर्शनास आले आहे. यास्तव प्रस्तुत प्रकरणी झालेल्या अनियमिततेचे स्वरुप विचारात घेऊन तत्कालीन तहसिलदार व अन्य संबंधित यांच्याविरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडून दिनांक २०/०२/२०२३ च्या पत्रान्वये प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाची शासन स्तरावर छाननी करण्यात येत असून पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

तत्कालीन तहसिलदार, डहाणू यांचे दिनांक ०९/०६/२०२१ चे आदेश जिल्हाधिकारी, पालघर यांच्या दिनांक ०४/०४/२०२२ च्या आदेशान्वये रद्द करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील तलाठी संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१९) * १७९८९ श्री.अरुण लाड, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.रामदास आंबटकर : तारांकित प्रश्न क्रमांक १५३५० ला दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महसूल विभागांतर्गत तलाठी पदाची भरतीप्रक्रिया सन २०२२ मध्ये घोषित करण्यात येवूनही अद्याप १०२८ पदे रिक्त असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यात तलाठी पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांची संख्या कमी असून एका तलाठ्याकडे ८ ते १० गावांचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आल्यामुळे स्थानिक नागरिकांची कामे प्रलंबित राहिली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील १८२ गावांसाठी १२ तलाठी कार्यरत असल्याने विद्यार्थी, शेतकरी, तसेच ग्रामस्थांना विविध शासकीय लाभ घेण्यासाठी तलाठी कार्यालयात वारंवार पाठपुरावा करावा लागत असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात रिक्त असलेली तलाठ्यांची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नांदगाव तालुक्यात एकूण-२७ तलाठी सजे असून त्यापैकी १७ पदांवर तलाठी कार्यरत आहेत.
सद्य:स्थितीत नांदगाव तालुक्यात रिक्त सजांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या तलाठ्यास सोपविण्यात आला असून स्थानिक नागरिकांची कामे प्रलंबित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे.
(३) डहाणू तालुक्यात एकूण-१८३ महसूल गावे असून डहाणू तालूक्यात तलाठी संवर्गाची एकूण-५१ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १३ पदे कार्यरत व ३८ पदे रिक्त आहेत. रिक्त तलाठी सजांचा अतिरीक्त कार्यभार नजिकच्या तलाठ्याकडे सोपविण्यात आलेला आहे.
(४) व (५) राज्यातील तलाठी (गट-क) संवर्गातील रिक्त पदे तसेच महसूल व वन विभागाचा शासन निर्णय दिनांक ०७/१२/२०२२ अन्वये नव्याने निर्माण केलेली ३११० पदे सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दिनांक ०४/०५/२०२२ व दिनांक २१/११/२०२२ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. त्याकरिता भरावयाच्या पदांची बिंदूनामावलीनुसार माहिती सर्व महसूली विभागांकडून घेण्यात येत असून भरतीप्रक्रियेची पुढील कार्यवाही विनाविलंब सुरु करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

-----------------

## पिंपळगाव बुद्रुक (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथील मुदतबाह्य व विनापरवाना किटकनाशकाचा साठा जप्त केल्याबाबत

**(२०) * १८०१७ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपळगाव बुद्रुक (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथे कृषि विभागाने छापा टाकून मुदतबाह्य व विनापरवाना किटकनाशकांचा साठा जप्त केल्याचे दिनांक ८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीस विभागाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुदतबाह्य व विनापरवाना किटकनाशकांचा साठा जप्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात येऊन संबंधित दोषींविरोधात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) होय, हे खरे आहे.

सदर कारवाई दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२२ रोजी कृषि विभागाकडून करण्यात आलेली आहे.
(२) हे खरे नाही.

पिंपळगाव बुद्रुक (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथे मुदतबाह्य व विना परवाना किटकनाशकांचा साठा करणाऱ्या एकूण ३ कृषि सेवा केंद्राविरूध्द पोलीस स्टेशन वरणगाव, ता.भुसावळ, जि.जळगाव येथे दिनांक ७ ऑक्टोबर, २०२२ रोजी FIR क्र. ०२११ दाखल करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने, पोलीस विभागाकडून तपास चौकशी सुरू आहे.
(३) जळगाव जिल्ह्यातील भुसावळ तालुक्यातील पिंपळगाव बुद्रुक येथील ३ कृषि सेवा केंद्राविरूध्द मिळालेल्या माहितीच्या आधारे छापा टाकून मुदतबाह्य व विनापरवाना करण्यात आलेला किटकनाशकांचा साठा जप्त करून, किटकनाशक अधिनियम, १९६८ चे कलम १३(१), १८(२) २९(१)(C) किटकनाशक नियम १९७१ चे कलम १०, १०A, १०C, १५, १६, ३०, ३१ पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९६८ चे कलम ७, ८ भादंवि कलम ४२० प्रमाणे दिनांक ०७/१०/२०२२ रोजी फिर्याद देऊन गुन्हा दाखल केलेला आहे. जप्त किटकनाशके यांचे प्रतिनिधीक नमुने काढून तपासणी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस विभागामार्फत सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पवनी (जि.भंडारा) तालुक्यातील खातखेडा घाटावर वाळू तस्करांनी महसूल उपविभागीय अधिकाऱ्यांवर हल्ला केल्याबाबत

**(२१) * १८०५५ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पवनी (जि.भंडारा) तालुक्यातील खातखेडा घाटावर वाळू तस्करांनी महसूल उपविभागीय अधिकाऱ्यांवर जीवघेणा हल्ला केल्याचे दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने हल्ला केलेल्या वाळू तस्करांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) दिनांक २३/१२/२०२२ रोजी मौजे खातखेडा (ता.पवनी, जि.भंडारा) या रेतीघाटावर उपविभागीय अधिकारी, भंडारा यांचेवर वाळू तस्कर यांनी जिवघेणा हल्ला केला नसून महसूल तलाठी/कर्मचारी यांच्यावर हल्ला केला आहे. त्यानुषंगाने संबंधिताविरूध्द पोलीस स्टेशन, पवनी येथे गु.र.क्र. ३३१/२०२२ भा.द.वि. कलम ३५३, ३३२, ३७९, ५०४, ५०६, ६४ व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८(७) व ४८(८) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामध्ये एका आरोपीस अटक करण्यात आली असून उर्वरीत आरोपींचा शोध पोलीस स्टेशन, पवनी यांच्याकडून घेण्यात येत आहे.

-----------------

## मुंबई - नागपूर समृद्धी महामार्गाच्या बांधकामाचे कंत्राट दिलेल्या कंपनीकडून विनापरवाना उत्खनन केल्याप्रकरणी दंड वसूल करण्याबाबत

**(२२) * १८१८९ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर : तारांकित प्रश्न क्रमांक १२२८५ ला दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नागपूर या शहरांना जोडणाऱ्या समृद्धी महामार्गाचा ४२ कि.मी.चा रस्ता बांधकामाचे कंत्राट दिलेल्या मॉन्टे कार्लो या कंपनीने सदर कामासाठी जालना-बदनापूर (जि.जालना), केळझर व खापरी (जि.वर्धा), सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) व खंडेश्वर (जि.अमरावती) तसेच इतर पाच जिल्ह्यांतील अनेक तालुक्यांत शासनाच्या नियमांचा अवलंब न करता विनापरवाना मुरुम उत्खनन केल्याप्रकरणी सदर कंपनीस रुपये ३२६ कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समृद्धी महामार्ग १० जिल्ह्यांतील २६ तालुक्यांतील ३९१ गावांमधून जात असून सदर महामार्ग तयार करताना कंत्राटदाराने माती, वाळू, मुरूम दगडाचा वापर करताना संबंधित तालुक्यांची परवानगी न घेता उत्खनन केले असल्याने कंत्राटदारावर कोट्यवधी रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटदारांना अवैध खनिज उत्खनन प्रकरणी दंड माफ करताना रॉयल्टी माफ केल्याने कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले असून त्याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित कंपनीकडून दंडाची रक्कम वसूल केल्याशिवाय संबंधितास अंतिम देयके अदा न करण्याबाबत जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडून पत्राद्वारे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना दिनांक ९ ऑक्टोबर, २०२० व दिनांक ६ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू कंपनीकडून दंडाची रक्कम वसुल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४), (५) व (६) मुंबई-नागपूर या शहराला जोडणारा समृद्धी महामार्गाच्या जालना जिल्ह्यातील कामामध्ये मॉन्टे कार्लो कंपनीने विनापरवाना मुरूम उत्खनन केल्यामुळे कंपनीस रुपये ३२६ कोटी दंड आकारण्यात आला. संबंधित कंपनीकडून दंडाची रक्कम वसुल केल्याशिवाय संबंधितास अंतिम देयके अदा करू नये असे जिल्हाधिकारी, जालना यांनी दिनांक ०९/१०/२०२० व दिनांक ०६/१२/२०२१ च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना कळविण्यात आले आहे. तसेच शासन पत्र दिनांक २९/११/२०२१ अन्वये दंडाची रक्कम सत्वर वसुल करण्याबाबत जिल्हाधिकारी, जालना यांना कळविण्यात आले आहे.

मुंबई-नागपूर या समृद्धी मार्गासाठी विभागाने दिनांक २७/०५/२०१९ च्या परिपत्रकान्वये गौण खनिज उत्खननाबाबत परवानगी देण्याची विहित केलेली कार्यवाही संबंधित कंत्राटदारांनी पालन न करता महामार्गाच्या कामासाठी लागणारे गौण खनिजाचे उत्खनन केल्याचे क्षेत्रिय महसूल अधिकाऱ्याकडून संबंधित कंत्राटदारांविरूध्द महाराष्ट्र महसूल जमीन संहिता, १९६६ कलम ४८(७) व ४८(८) अन्वये दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

दिनांक १७/११/२०२२ रोजीच्या राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये "हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे" महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या गौण खनिजाबाबत क्षेत्रिय महसूल यंत्रणेमार्फत निर्गमित केलेली सर्व दंडनिय कार्यवाहीचे आदेश व क्षेत्रिय महसूल यंत्रणेसमोर दंडनिय कारवाईबाबत सध्या सूरु असलेली प्रकरणे रद्द करण्यात यावीत अश्या घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने दिनांक ०३/०१/२०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

-----------------

## औरंगाबाद जिल्ह्यामधील पाझर तलावाच्या कामासाठी भूसंपादन केलेल्या शेतकऱ्यांना वाढीव मोबदला मिळण्याबाबत

**(२३) * १८०७७ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील पाझर तलावाच्या कामासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबतची मागणी शेतकऱ्यांनी मा.मंत्री, रोजगार हमी योजना यांना माहे डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांना भूसंपादन कायदा, १८९४ नुसार कलम १८ व २८(अ) अन्वये मा.दिवाणी न्यायालय व जिल्हाधिकारी यांनी पाझर तलावासाठी संपादित केलेल्या जमिनीचा वाढीव मोबदला मंजूर करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद जिल्ह्यामध्ये पाझर तलावासाठी शेतकऱ्यांच्या संपादित करण्यात आलेल्या जमिनींचा वाढीव मोबदला देण्यासाठी प्राप्त झालेल्या निधीमधून प्रथम ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केलेल्या आहेत त्यांच्याव्यतिरिक्त नव्याने जमिनी संपादित केलेल्या शेतकऱ्यांना त्यांचा मोबदला वितरित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २००१ मध्ये संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला २१ वर्षांचा कालावधी उलटून गेल्यानंतरही न मिळाल्याने शेतकऱ्यांनी मा.मुख्य सचिवांकडे आत्महत्या करण्याबाबतचे लेखी निवेदन दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पाझर तलावासाठी शेतकऱ्यांना त्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा निर्णयाप्रमाणे मोबदला वितरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) होय.
(२) होय.
(३) अंशत: खरे.
(४) होय.
(५) वित्त विभागाकडून प्राप्त होत असलेल्या निधीनुसार निधी वितरणाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या निवडणुकीत अनामत रकमेत केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(२४)** * **१६९३१ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गाव पातळीवरील शेतकऱ्यांच्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या निवडणुका सहकार निवडणूक प्राधिकरणाने "ब" वर्गात समाविष्ट करून त्या निवडणूका घेण्याची जबाबदारी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्यावर सोपविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे जिल्ह्यातील १००० पेक्षा जास्त विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण झाली असून या निवडणुकांसाठी शेतकऱ्यांना उमेदवारी अर्ज भरताना अनामत रकमेबाबत कोणत्याही पावत्या न देणे, या रकमा संस्थेच्या खाती नसणे वा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या स्वतंत्र खाती ठेवण्यात आलेल्या नसणे तसेच निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्या रकमा संबंधित शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अनामत रकमेचा गैरव्यवहार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांशी संगनमत करुन केला असल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुणे जिल्ह्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या निवडणुकीच्या अनामत रकमेचा गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०३/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मावळ तालुक्यातील सभासद शेतकऱ्यांना अनामत रकमा परत मिळत नसल्याबाबतची तक्रार सहकार आयुक्त व निबंधक,

सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे केली आहे. सदर तक्रारीच्या दिनांकापर्यंत मावळ तालुक्यातील ज्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या निवडणूका पूर्ण झाल्या आहेत अशा संस्थांच्या निवडणूक अनामत रकमा संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी संबंधित उमेदवारांना परत केल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर चित्रनगरीचे आधुनिकीकरण करण्याबाबत

**(२५) * १८१६५ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्ये मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर चित्रनगरीत चित्रीकरणासाठी अद्ययावत सोयीसुविधा निर्माण करण्याचा निर्णय घेण्यासाठी मा.मंत्री, सांस्कृतिक कार्ये यांच्या अध्यक्षतेखाली कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाच्या संचालक मंडळाची बैठक दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठकीत कोल्हापूर चित्रनगरीचा अधिकाधिक विकास आणि आधुनिकीकरणाचे नियोजन करण्याच्यादृष्टीने प्रस्ताव सादर करुन आवश्यक त्या निविदा काढण्याबाबत संबंधितांना सूचित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बैठकीत सौरऊर्जा प्रकल्प बसविणे, बाह्यस्त्रोतावर सुरक्षारक्षक पुरविणे, कर्मचारी पुरविणे, कोल्हापूर चित्रनगरीत आवश्यक तेथे पथदिवे लावणे, पाण्याची उच्चतम टाकी बांधणे याबाबतही निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मा.मंत्री, सांस्कृतिक कार्ये यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार कोल्हापूर चित्रनगरीचे आधुनिकीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१), (२), (३) व (४) होय, खरे आहे.
कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाच्या संचालक मंडळाची १० वी बैठक दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी सांस्कृतिक कार्ये मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.
सदर बैठकीमध्ये कोल्हापूर चित्रनगरीच्या आधुनिकीकरणासाठी मा.मंत्री (सांस्कृतिक कार्ये) यांनी दिलेल्या निदेशानुसार आवश्यक कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठी चित्रपटांसाठी व्हीपीएफ चार्जेस ५० टक्के करण्याबाबत

**(२६) * १७८४६ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्ये मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील अनेक राज्यांमध्ये प्रादेशिक भाषा व संस्कृतीस प्रोत्साहन देण्यासाठी प्रादेशिक चित्रपटांकरिता व्हीपीएफ चार्जेस (डिजिटल चार्जेस) हे ५०% आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्रात मराठी चित्रपटांकरिता व्हीपीएफ चार्जेस (डिजिटल चार्जेस) हे १००% असून सामाजिक विषयांवर आधारित चित्रपटांकरिता अल्प स्वरूपात अनुदान देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सामाजिक हित लक्षात घेऊन सामाजिक विषयांवर आधारित चित्रपटांकरिता देण्यात येणाऱ्या अल्प अनुदानात वाढ करण्यात येऊन मराठी चित्रपटांकरिता व्हीपीएफ चार्जेस ५० टक्के करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मराठी चित्रपटांकरिता अनुदान वाढवून देण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) इतर राज्यांकडून याबाबत माहिती मिळविण्यात येत आहे.
(२), (३) व (४) व्हीपीएफ चार्जेस (डिजिटल चार्जेस) ही बाब चित्रपट निर्माता व चित्रपटगृह मालक यांच्या व्यवहारातील असल्याचे निदर्शनास येते.

दर्जेदार मराठी चित्रपटांना परिक्षण समितीच्या परिक्षणांती "अ" व "ब" दर्जाच्या चित्रपटास अनुदानापोटी अनुक्रमे रुपये ४० लक्ष व रुपये ३० लक्ष इतके अनुदान देण्यात येते. सदरहू अनुदानात वाढ करण्याची बाब विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यामध्ये महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत शेत जमीन तयार करण्याबाबत

**(२७) * १७७०४ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यातील ६५२ गावांमध्ये शासकीय जमिनीवर महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून शेत जमीन तयार करण्याच्या कामाला मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत शेत जमीन तयार करण्याच्या कामाची अद्यापही अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने यवतमाळ जिल्ह्यातील ६५२ गावांमध्ये महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून शेत जमीन तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.

तसेच अशी बाब शासनस्तरावर निर्दशनास आलेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अवैध वृक्षतोड रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(२८) * १७५८५ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या वन क्षेत्रात भर घालण्यासाठी वन खात्यामार्फत कोटयवधी वृक्षलागवडीची योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात गत पाच वर्षात अवैधरित्या सुमारे ५ लाख ५० हजार ७४९ वृक्षतोड करण्यात आली असून त्यामुळे रुपये ५ कोटी ४३ लाख इतक्या रकमेचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या सीमेवर तस्करांमार्फत व्यापारी तत्त्वावर अवैधरित्या सागाची तस्करी करण्यात येऊन परराज्यात वाहतूक करण्याचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात अवैधरित्या होणाऱ्या वृक्षतोडीवर व तस्करांमार्फत होणाऱ्या सागाच्या वाहतुकीवर आळा घालण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) राज्यात दरवर्षी वृक्षांची लागवड करण्यात येते. सन २०२२ या वर्षात एकूण २,२३,७४,१३७ इतक्या वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.

(२) राज्यात मागील ५ वर्षात एकूण ३,२७,०९० इतकी अवैध वृक्षतोड झाली असून त्यामुळे रुपये २,२३१.२६ लाख इतके नुकसान झालेले आहे.

(३) गडचिरोली वनवृत्तातील सिरोंचा वनविभागात काही ठिकाणी व्यापारी तत्वावर अवैधरित्या सागवान वृक्षांची तोड करुन तस्करी करुन तेलंगना राज्यात वाहतूक करण्याच्या घटना अधूनमधून घडतात.

तसेच नाशिक वनवृत्तातील पश्चिम भाग नाशिक वनविभागात दिनांक २५/०७/२०२२ रोजी सागवानांची अवैध वाहतूक करतांना दोन गाड्या जप्त करण्यात आल्या होत्या.

परंतु, इतर वनवृत्तामध्ये राज्याच्या सीमेवर तस्करांमार्फत व्यापारी तत्वावर अवैधरित्या सागाची तस्करी करण्यात येऊन परराज्यातून वाहतूक केल्याचे निदर्शनास आले नाही.

(४) वृक्षतोडीवर व अवैध वाहतुकीवर आळा घालण्यासाठी उपाययोजना:-

१) प्रत्येक वनवृत्तामार्फत अवैध वृक्षतोड, अवैध वाहतूक, व इतर वनगुन्हे यांच्यावर नियंत्रण ठेवण्याच्यादृष्टीने प्रत्येक वनपरिक्षेत्रातील सर्व नियतवनक्षेत्राचे निरीक्षण मापदंडानुसार नियमितपणे करण्यात येते.

२) वनपरिक्षेत्र अधिकारी फिरते पथक कार्यरत असून तस्करीवर आळा घालण्यासाठी नियमितपणे गस्त करीत असतात.

३) वन कर्मचारी यांच्या सहाय्याने अति संवेदनशिल व संवेदनशिल भागात वारंवार गस्ती करण्यात येते, धाडी टाकणे, नाकाबंदी करणे इत्यादी कर्तव्य पार पाडण्यात येतात.

४) अवैध वृक्षतोड किंवा अवैध वाहतूक आढळून आल्यास भारतीय वन अधिनियम, १९२७ अन्वये कारवाई करण्यात येते.

५) टोल फ्री Helpline सेवा : लोकांकडून वन विभागातील अवैध घटनांची माहिति प्राप्त होण्यासाठी टोल फ्री क्र. "१९२६" वर कार्यान्वित आहे.

६) अवैध वृक्षतोडीची प्रकरणे निदर्शनास आल्यानुसार वेळोवेळी चौकशी करुन कर्तव्यामध्ये निष्काळजीपणा केलेल्या कर्मचाऱ्यांविरुध्द कार्यवाही करण्यात येते.

७) संवेदनशील आंतर राज्य सीमेवर अवैध वृक्षतोड नियंत्रणाखाली ठेवण्याकरिता वरिष्ठ वनअधिकाऱ्यांची आंतराज्यीय बैठक घेण्यात येतात.

८) राज्यामध्ये मोक्याच्या ठिकाणी ३६६ स्थाई व ९६ अस्थाई असे एकूण ४६२ तपासणी नाके उभारण्यात आलेले आहे, त्यामध्ये ४२ आंतरराज्य सीमा तपासणी नाके आहेत. सदर तपासणी नाक्यावर वाहतुकीतील वनोपजाची तपासणी करण्यात येते.

९) पोलीस विभागाच्या धर्तीवर खबऱ्यांचे जाळे विकसित करण्यासाठी वनविभागात गुप्त सेवा निधी स्थापन करण्यात आलेला आहे.

१०) वनामध्ये अवैध कटाई व अवैध वाहतूक यावर नियंत्रण ठेवण्यासाठी ६८१ वनसंरक्षण कुट्या कार्यान्वित आहेत.

११) संपर्कासाठी दुर्गम असलेल्या क्षेत्रामध्ये माहीतीची देवाण-घेवाण करुन वनसंरक्षण प्रभावीपणे व्हावे या दृष्टीकोनातून बिनतारी संदेश यंत्रणा कार्यान्वित आहे.

१२) गाव पातळीवर संयुक्त वनव्यवस्थापन समित्या स्थापन झाल्या असून, त्यांचा सहभाग वनांचे संरक्षणात केला जातो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आद्यक्रांतीवीर राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणेबाबत

**(२९) * १६९६९ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यात रामोशी आणि इतर भटक्या विमुक्त जातीच्या सर्वांगीण विकासासाठी राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात येणार असल्याबाबत बेडर व बेरड समाजाच्या राज्यव्यापी मेळाव्यामध्ये शासनामार्फत आश्वासन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याकरिता रुपये ५०० कोटींची विशेष तरतूद महामंडळाकडे करण्याबाबतची मागणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने रुपये १०० कोटींची व आद्यक्रांतीवीर राजे उमाजी नाईक यांच्या स्मारकासाठी रुपये ५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आद्यक्रांतीवीर राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे.
तत्कालीन मुख्यमंत्री यांनी घोषणा केली होती.
(२) होय, अंशत: खरे आहे.
याबाबत जय मल्हार क्रांती संघटनेकडून रुपये २०० कोटींची मागणी करण्यात आली आहे.
(३) होय, अंशत: खरे आहे.
वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळास रुपये ३००.०० कोटी सहायक अनुदान मंजूर करण्यात आले असून, त्यापैकी रुपये १००.०० कोटी निधी रामोशी व इतर समाजाच्या लोकांच्या आर्थिक उन्नत्तीकरिता राखून ठेवण्यास शासन निर्णय क्र.वनामं २०१७/प्र.क्र.८७/महामंडळे, दिनांक २८ जानेवारी, २०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच राजे उमाजी नाईक यांच्या स्मारकासाठीची बाब ग्रामविकास व पंचायतराज विभागाशी संबंधित असून, त्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांस कळविण्यात आले आहे.
(४) वसंतराव नाईक आर्थिक विकास महामंडळांतर्गत राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ या उपकंपनीची स्थापना करण्याबाबतचा मंत्रिमंडळ प्रस्ताव अभिप्राय व मान्यतेसाठी धारिका क्र.महामं-२०२३/प्र.क्र.१४/महामंडळे अन्वये नियोजन व वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आरे दुग्ध वसाहत (गोरेगाव, मुंबई) परिसरातील अपूर्णावस्थेत असलेल्या रस्त्यांचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(३०) * १८१७४ श्री.राजहंस सिंह, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील पूर्व आणि पश्चिम उपनगरांना जोडणाऱ्या आणि परिसरात जाणाऱ्या रस्त्यांची देखभाल करण्यास दिरंगाई करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करण्याबाबत शासनाला मा.उच्च न्यायालयाने प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरे दुग्ध वसाहत (गोरेगाव, मुंबई) येथील मुख्य रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरणाचे काम अपूर्णावस्थेत असल्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होत असून पश्चिम द्रुतगती महामार्गाला जोडणाऱ्या मयूर नगर ते आरे मार्केट येथील रस्त्यावर झालेल्या खड्डयांमुळे स्थानिक रहिवाशांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान याचिका दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माहे जुलै, २०२२ मध्ये रस्त्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष केल्यामुळे रस्ता वाहून गेला असून याबाबत याचिका दाखल करुनही सरकारी वकील कर्तव्य बजावण्यास दिरंगाई करत आहे हे याचिकाकर्त्यांनी निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रस्त्यांचे बांधकाम पूर्ण करुन वाहतूक कोंडी सोडविण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) मयुर नगर ते आरे मार्केट या रस्त्याच्या दुरुस्तीसंदर्भात मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या प्रकरणात शपथपत्र दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) व (५) आरे मधील अंतर्गत रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी रुपये ४८ कोटी खर्चाच्या प्रस्तावास सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे तांत्रिक मान्यता देण्यात आली असून, सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात यासाठी निधीची तरतूद करण्यासाठी वित्त विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

-----------------

## मावळ (जि.पुणे) तालुक्यात मुरुम व लाल मातीचे अवैधरित्या उत्खनन होत असल्याबाबत

**(३१)** * **१७८७० श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मावळ (जि.पुणे) तालुक्यात डोंगरावर मुरुम व लाल मातीचे उत्खनन करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डोंगरांवर मुरुम व लाल मातीचे उत्खनन करण्याचे प्रमाण वाढल्याने डोंगर टेकड्या नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येळासे (ता.मावळ, जि.पुणे) गावातील टेकड्यादेखील मोठ्या प्रमाणात नष्ट केल्या जात असून यापूर्वी सन १९८९ मध्ये भाजे (ता.मावळ, जि.पुणे) गावात डोंगर टेकड्यांचे उत्खनन केल्याने दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेत ३७ जण मृत्यूमुखी पडले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने डोंगर टेकड्यांवर लाल माती व मुरुम यांचे अवैधरित्या उत्खनन करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) मावळ, जि.पुणे तालुक्यात डोंगरावर मुरूम व लाल मातीचे उत्खनन करत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान तहसिलदार, मावळ किंवा क्षेत्रिय अधिकारी यांचे निदर्शनास आलेले नाही.

सन १९८९ मध्ये जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे मौजे. भाजे, ता.मावळ, जि.पुणे येथे भुस्खलन झाल्याची दुर्घटना घडून काही लोक मृत्यूमुखी पडले होते.

डोंगर टेकड्यांवर लाल माती व मुरूम यांचे अवैधरित्या उत्खनन आढळून आलेले नाही. त्यामुळे दोषींविरूध्द कारवाई करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## मानेगाव, उचंदा, मेळसांगवे (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील पूर्णा नदी पात्रातील हात भट्टीवर अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त केल्याबाबत

**(३२) * १८०१८ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानेगाव, उचंदा, मेळसांगवे (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील पूर्णा नदी पात्रातील हातभट्टीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून छापा टाकण्यात येऊन सुमारे अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त केल्याचे दिनांक १ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गुन्हा दाखल करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई :** (१) हे खरे आहे.

तथापि, सदर ठिकाणी दिनांक ८ ऑक्टोबर, २०२२ रोजी कारवाई करण्यात येऊन एकूण रुपये १,९४,७००/- इतक्या रकमेचा मुद्देमाल जागेवरच नष्ट करण्यात आला आहे.

(२) सदर प्रकरणी पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांनी दिनांक ०८/१०/२०२२ रोजी संयुक्तपणे कारवाई केली आहे. सदर ठिकाणी एकूण ९ बेवारस गुन्हे नोंदविण्यात येऊन तेथील रसायन, प्लास्टिक ड्रम इ. मुद्देमाल जागेवरच नष्ट केला आहे.

तसेच, दिनांक १४/०१/२०२३ रोजी राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांनी सदर ठिकाणी ४ बेवारस गुन्हे नोंदवून रसायन, प्लास्टिक ड्रम इ. एकूण रुपये १,५५,५५०/- इतक्या रकमेचा मुद्देमाल जागेवरच नष्ट केलेला आहे.

सदर गुन्हे तपासाधीन आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पतसंस्थांमधील सर्वसामान्यांच्या ठेवींना विम्याचे संरक्षण मिळण्याबाबत

**(३३) * १८१८८ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरात सुमारे सोळा हजारांहून अधिक पतसंस्था असून, त्यामध्ये कष्टकरी वर्गापासून मध्यमवर्गीयांपर्यंतच्या ठेवीदारांच्या ठेवी असून सर्वसामान्य ठेवीदारांना आर्थिक बळ देण्याचे महत्त्वाचे काम पतसंस्थेमार्फत करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकांमधील पाच लाखांपर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण देणाऱ्या ठेव विमा संरक्षण कायद्याच्या धर्तीवर राज्यात पतसंस्थांमधील सर्वसामान्यांच्या ठेवींनाही विम्याचे कवच देण्यासाठीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील पतसंस्थांमधील ठेवींना विम्याचे संरक्षण देऊन सदरहू प्रस्तावाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) सद्य:स्थितीत राज्यात १३,४१२ नागरी/ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था आणि ६,५३६ कर्मचारी सहकारी पतसंस्था अशा एकूण १९,९४८ सहकारी पतसंस्था कार्यरत आहेत. या पतसंस्थांमध्ये ३.१० कोटी ठेवीदारांच्या एकूण रुपये ९०,५०१ कोटी इतक्या रक्कमेच्या ठेवी आहेत.
(२) व (३) राज्यातील नागरी/ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या कामकाजामध्ये गुणात्मक सुधारणा करण्यासाठी आणि त्यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी दिनांक ३१/०१/२०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये नियमाक मंडळ गठित करण्यात आले आहे.

बँकांमधील पाच लाखांपर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण देणाऱ्या ठेव विमा संरक्षण कायद्याच्या धर्तीवर राज्यात पतसंस्थांमधील सर्वसामान्यांच्या ठेवींनाही विम्याचे कवच देण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदींनुसार स्थिरीकरण व तरलता निधी दिनांक ११/०९/२०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये स्थापन करण्यात आला आहे. सदर निधीसाठी नियामक मंडळाने ठरविलेल्या दराने व पध्दतीने पतसंस्थांनी अंशदान द्यावयाचे आहे. सद्य:स्थितीत हा दर १० पैसे प्रति १०० रुपये ठेव असा ठरविण्यात आला आहे.

मात्र अशा प्रकारे अंशदान देण्यास बऱ्याच पतसंस्थांनी तसेच पतसंस्था फेडरेशनने विरोध केला असून अंशदानाची तरतूद रद्द करण्याची मागणी देखील केली आहे.

नियामक मंडळाने लागू केलेले अंशदान रद्द करणे उचित होणार नाही. तथापि, याबाबत तातडीच्या अंमलबजावणीची आवश्यकता विचारात घेऊन संबंधित घटकांशी चर्चा करुन सुयोग्य अंशदान लागू करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील शेतकऱ्यांना डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेचा लाभ मिळण्याबाबत

**(३४) * १८०७८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत अनुदान योजनेचा लाभ देण्यात येत असून सदर योजनेमध्ये विहित मुदतीत अल्प मुदत पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून कर्जावर व्याज सवलत देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात विशेषत: वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना सन २०१८-२०१९, २०१९-२०२० व २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेचा लाभ मिळाला नसल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकास सोसायटी व राष्ट्रीयकृत बँकेमधून पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना सदर योजनेचा लाभ मिळण्याकरिता जिल्ह्यातील सहकार अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत सहकार आयुक्तांकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रस्ताव सहकार आयुक्तांकडे न पाठविणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक राजकीय नेत्यांनी सहकार आयुक्तांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रस्ताव पाठविण्यासाठी दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करुन वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील शेतकऱ्यांना डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेचा लाभ मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय.
(२), (३), (४) व (५) अंशत: खरे आहे.

पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेंतर्गत सन २०१८-२०१९, २०१९-२०२० व २०२०-२०२१ या आर्थिक वर्षातील वैजापूर तालुक्यातील ११० विविध कार्यकारी सहकारी संस्थांच्या ९६८४ लाभार्थी सभासदांना रुपये ६९.२३ लाख रक्कम वितरित केली आहे. तसेच सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षातील महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा लोणी खु.च्या ६५९ लाभार्थी सभासदांना रुपये १२.७८ लाख वितरित केली आहे.

तसेच सदर योजनेंतर्गत शासनाने संपूर्ण राज्यासाठी रुपये १६२४.०० लाख इतका निधी दिनांक १३/०२/२०२३ च्या शासन निर्णयान्वये वितरित केला आहे. त्यापैकी औरंगाबाद जिल्ह्यासाठी सहकार आयुक्तांनी दिनांक २२/०२/२०२३ च्या आदेशान्वये रुपये ५०.०० लाख इतका निधी वितरित केला आहे.

वैजापूर तालुक्यात १० राष्ट्रीयकृत बँकांच्या १० शाखा आहेत. या बँकांनी डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेचे सन २०१८-२०१९ व २०१९-२०२० या आर्थिक वर्षांचे प्रस्ताव सादर केलेले नाहीत. त्यानुषंगाने प्रस्ताव सादर करणेबाबत जिल्हा उपनिबंधक, औरंगाबाद यांचेकडून संबंधित बँकांना वेळोवेळी कळविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कामशेत (जि.पुणे) येथील डोंगराला आग लागून वनसंपदेचे नुकसान झाल्याबाबत

**(३५)** * **१७८७२ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कामशेत (जि.पुणे) येथील शिरोला वन विभागाचे जुने कार्यालय असलेल्या डोंगराला आग लागल्याने वनसंपदेचे नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वनसंपदेला लागलेली आग विझविण्याकरिता वन विभागाकडे कोणतीच यंत्रणा उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर आग लागण्याची कारणमीमांसा करुन भविष्यात वनसंपदेला लागलेल्या आगीमुळे वनसंपदेचे नुकसान होणार नाही यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) कामशेत हे पुणे वनविभागातील शिरोला वन परिक्षेत्रात येत नसून वडगाव मावळ वन परिक्षेत्रामध्ये येते.

कामशेत या गावाला लागून असलेल्या खडकाळे गावाच्या हद्दीमधील वन विभाग फॉ.गट क्र.१४९ ला लागून असलेल्या मालकी गट क्र.१५१ मध्ये आग लागल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची आग वन विभागाच्या हद्दीत येण्यापूर्वीच क्षेत्रिय कर्मचाऱ्यांनी तात्काळ विझविली असल्यामुळे वनसंपदेचे नुकसान झालेले नाही.
(२) आग विझविण्याकरिता वडगाव, मावळ वनपरिक्षेत्राकडे फॉयर वॉचर-१२, फॉयर ब्लोअर-२, ग्रास कटर-३, फायर बिटर-४, वॉटर टँकर-२ इत्यादी साहित्य उपलब्ध आहेत.
(३) वन वणव्यावर नियंत्रण आणण्यासाठी भारतीय वन सर्वेक्षण संस्था डेहराडून यांच्या फायर अलर्ट संकेत स्थळावर वन परिक्षेत्र अधिकारी, वनपाल, वनरक्षक यांचे भ्रमणध्वनी क्रमांक नोंदणी केलेले आहेत. या व्यतिरिक्त वनवणवा प्रतिबंधक दलाची स्थापना केली आहे. वणवा लागल्याचे संदेश प्राप्त झाल्यास वनवणवा प्रतिबंध दलाच्या सहाय्याने क्षेत्रिय कर्मचारी घटनास्थळी जावून आग विझवितात. तसेच वनवणवा लागू नये म्हणून वनक्षेत्राच्या हद्दीवर फायर लाईन घेतले जाते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चाळीसगाव (जि.जळगाव) तालुक्यातील पाटणादेवी मंदिराकडे जाणाऱ्या पुलाची दुरवस्था झाल्याबाबत

**(३६)** * **१८०१९ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्ये मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव (जि.जळगाव) तालुक्यातील पाटणादेवी मंदिर हे पर्यटनस्थळ असून सदर मंदिराकडे जाणाऱ्या पुलाची दुरवस्था झाली असल्याने दर्शनासाठी जाणाऱ्या भक्तांना जीव धोक्यात घालून पुलावरून जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाची दुरुस्ती करण्याबाबत स्थानिकांनी मा.मंत्री, वने यांच्याकडे केलेल्या मागणीच्या अनुषंगाने मा.मंत्री, सांस्कृतिक कार्ये यांनी सदर पुलाची दुरुस्ती करण्याबाबत दिनांक १ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास आश्वासित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने स्थानिकांनी केलेल्या मागणीनुसार पाटणादेवी मंदिराकडे जाणाऱ्या पुलाची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर पुलाची दुरूस्ती करण्याबाबत श्री.प्रफुल्ल साळुंखे, चाळीसगाव विकास मंच यांनी दिनांक ०६/१०/२०२२ रोजी मा.मंत्री (वने) यांना निवेदन सादर केले होते.

(३) पाटणादेवी मंदिर हे केंद्र संरक्षित स्मारक आहे. प्रश्नांकित पुल बांधण्याचे काम हे या मंदिराच्या १०० मी. च्या आत येते. त्यामुळे पाटणादेवी मंदिराकडे जाणारा हा पुल दुरुस्त करण्याचे काम आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, औरंगाबाद मंडळ, औरंगाबाद या कार्यालयामार्फत करण्याचे प्रस्तावित आहे.

सदर पुल बांधावयाचा झाल्यास, त्याकरिता वन जमिनीचा वापर करावा लागणार असल्याने वन (संवर्धन) अधिनियम, १९८० नुसार प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. तसेच सदरचे क्षेत्र हे अभयारण्याचा भाग असल्याने या पुलाच्या बांधकामापूर्वी वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम २९ अन्वये वन्यजीव मंडळाची मान्यता घेणे देखील आवश्यक आहे. याबाबत भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, औरंगाबाद मंडळ, औरंगाबाद पुढील कार्यवाही करणार आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या ग्राम रोजगार सेवकांवरील अन्याय दूर करण्याबाबत

**(३७) * १८१९३ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना अधिनियम, २००५ मधील मागेल त्याला काम या धोरणानुसार राज्यातील ३४ जिल्ह्यात जवळपास ३० हजार ग्रामपंचायत क्षेत्रातून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामाची अत्यल्प मानधनावर सेवा करणाऱ्या ग्रामरोजगार सेवक, सहाय्यक कार्यक्रमाधिकारी, तांत्रिक सहाय्यक अधिकारी व क्लर्क-कम-डाटा एन्ट्री ऑपरेटर यांना रोजगार हमी योजनेचा कणा समजला जात असून तुटपुंज्या मानधनावर ग्राम रोजगार सेवक कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहायक कार्यक्रम अधिकारी, तांत्रिक सहायक व क्लर्क-कम-डाटा एन्ट्री ऑपरेटर यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत स्वतंत्र यंत्रणा तयार करून कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना आकृतीबंधात समायोजित करणे, मध्यप्रदेश शासनाप्रमाणे कर्मचाऱ्यांना वयाच्या ६२ वर्षापर्यंत नोकरीची हमी देणे, इ. मागण्यांबाबत अनेकदा शासनास निवेदने देण्यात आले असतानाही सदर मागण्या अद्यापही प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने काढलेल्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात न आल्याने ग्रामरोजगार सेवकांना मासिक मानधन, प्रवास भत्ता, अल्पोपहार भत्ता मिळाला नसून त्यांनी दिनांक १ फेब्रुवारी, २०२३ पासून बेमुदत काम बंद आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्यातील २८ हजार ग्रामपंचायतीत काम करत असलेल्या ग्राम रोजगार सेवकांवरील अन्याय दूर करणे तसेच सहायक कार्यक्रम अधिकारी, तांत्रिक सहायक व क्लर्क-कम-डाटा एन्ट्री ऑपरेटर यांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) ग्रामरोजगार सेवक हा ग्रामपंचायतीमार्फत नियुक्त केलेला व अर्धवेळ मानधन तत्वावर काम करणारा कर्मचारी आहे. त्याने स्वत:ची वैयक्तिक कामे करुन मनरेगाच्या कामात सहकार्य करणे अपेक्षित आहे. तसेच अन्य कंत्राटी कर्मचारी यांचे समवेत बैठक आयोजित करण्यात येवून पुढील कार्यवाहीबाबत निर्णय घेण्यात येतील.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.